## सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-०००१७०-२०१६

## नियमित दिवाणी दावा क्र.५६/२०१६

## निशाणी क्र. १०१ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ४ सह आदेश ६ नियम १७ अन्वये प्रतिवादी क्र.४ यांचे वारस रेकॉर्ड घेवून तशी दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीने आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.४ब माधवी मंगेश कांदळकर पुर्वाश्रमीची काशिबाई लवू पाटकर ही दि.१५/०४/२०२४ रोजी मयत झाली आहे. तरी मयत प्रतिवादी क्र.२ यांचे वारस याकामी सामील करणेत यावे अशी विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीचा अर्ज खोटा व खोडसाळ आहे. सबब, सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा.

४. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, नि.क्र. ९८ येथे मयत प्रतिवादी क्र.४ब माधवी मंगेश कांदळकर यांचे मृत्यूप्रमाणपत्र दाखल केले आहे. सदर प्रमाणपत्रावरुन प्रतिवादी क्र.४ब या मयत असल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज वादीने उशिराने दाखल केलेला आहे. वादीचे विलंबाबाबतचे नमुद कारण स्विकारार्ह नाही. प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरिता दाखल केलेला आहे. मात्र न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना व वादी, प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत अर्ज मंजूर करुन मयत प्रतिवादी क्र.४ब यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## - आदेश -

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीस प्रतिवादी क्र.४ब यांचे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब वादीने प्रतिवादी यांना रक्कम रुपये २००/- देण्याच्या अटीवर माफ करणेत येत आहे.

३. वादीने प्रतिवादी क्र.४ब यांचे वारस अभिलेखावर घेवून तशी त्वरीत दुरुस्ती करावी.

NANDA BAPUSO GHATAGE
Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2024.10.03 17:16:21 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )

दिनांकः ०१/१०/२०२४

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.